(४)

मिरा भाईंदर महानगरपालिका
सचिव विभाग
स.प./न.प./ज.प./का.प./मा.अ.
आवक क्र ०४ ........दि २० ३/२०

# केंद्रशासनाचा माहिती मिळविण्याचा अधिकार २००५
## नमुनापत्र - ३
### माहिती मिळविण्याकरीता करावयाच्या अर्जाचा नमुना




प्रति,
मा. जनमाहिती अधिकारी,
मा. नगर सचिव साहेब,
मिरा-भाईंदर महानगर पालिका,
भाईंदर -प., ता.जि. ठाणे- ४०१ १०१

१) अर्जदाराचे नाव :- श्री. ओमप्रकाश श्रीलाल पाल
मो. नं. ९७०२८४६९७६

२) पत्ता :- काशिमिरा, जनता नगर, दत्त मंदिर रोड, हरीओम चाळ समोर,सरोगी बिल्डींगच्या बाजूला, पो.मिरा, मिरारोड-पुर्व, ता.जि.ठाणे-४०१ १०७

३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल:-

(एक) माहितीचा विषय :- ठरावाच्या सत्यप्रतीची संपुर्ण संचिका मिळणेंबाबत—

(दोन) माहितीशी संबंधित कालावधी :- आजता गायत

(तीन) आवश्यक असलेला माहितीचे वर्णन :- मिरा-भाईंदर महानगर पालिका क्षेत्रातील टेंबा हॉस्पीटल चे नामकरण पंडित भिमसेन जोशी रूग्णालय, राष्ट्रपती अब्दुल कलाम नाटयगृहाचे नामकरण लता मंगेशकर नाटयगृह, असे करण्याकरीता झालेला नामकरणाचा ठराव व यापुर्वी झालेला नामकरणाचा ठराव या ठरावांच्या संपुर्ण संचिकेची सत्यप्रती आपली जी काही शासकीय फी असेल ती घेवुन देण्यांत यावी

(चार) माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तीश: आवश्यक आहे किंवा कसे :- व्यक्तीश:.

(पाच) ज्यासाठी माहिती आवश्यक आहे ते प्रयोजन :- न्यायालयीन कामकाजाकरीता

(सहा) अर्जदार दारीद्रय रेषेखालील आहे किंवा नाही :- नाही

ठिकाण :- भाईंदर (प.) ४०१ १०१

दिनांक :- २०/०३/२०२४

अर्जदाराची स्वाक्षरी

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,

छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101

सचिव विभाग


जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./ ०६ /2024 दिनांक :- ०२ /०४/2024

प्रति,

मा. जनमाहिती अधिकारी,

मिळकत विभाग,

मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार 2005.
ठरावाच्या सत्यप्रतीची संपुर्ण संचिका मिळणेबाबत.

संदर्भ :- श्री. ओमप्रकाश पाल यांचेकडील दि. 20/03/2024 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये श्री. ओमप्रकाश पाल यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील टेंबा हॉस्पीटल चे नामकरण पंडित भिमसेन जोशी रुग्णालय, राष्ट्रपती अब्दुल कलाम नाट्यगृहाचे नामकरण लता मंगेशकर नाट्यगृह असे नामकरण करण्यात आलेल्या ठराव व या ठरावाच्या संपूर्ण संचिकेची मागणी केलेली आहे.

संदर्भित पत्रातील ठरावाच्या संचिके संबंधित माहिती हा मुद्दा मिळकत विभागाशी निगडीत असल्याने, संदर्भित अर्जाची छायांकित प्रत आपणांकडे वर्ग करण्यात येत आहे. तरी कृपया अर्जदारांस अपेक्षीत माहिती परस्पर द्यावी ही विनंती.

(जयेश दामोदर पाटील)
सहा. जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :-

श्री. ओमप्रकाश पाल,
काशिमिरा, जनता नगर, दत्त मंदिर रोड,
हरीओम चाळ समोर, सरोगी बिल्डींगच्या बाजूला,
पो. मिरा, ता.जि.ठाणे 401107.

3/04/24

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
सचिव विभाग


जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./ ०४ /2024 दिनांक :- ०२/०४/2024

प्रति,
श्री. ओमप्रकाश पाल,
काशिमिरा, जनता नगर,
दत्त मंदिर रोड, हरीओम चाळ समोर,
सरोगी बिल्डींगच्या बाजूला,
पो. मिरा, ता.जि.ठाणे 401107.

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार 2005.
ठरावाच्या सत्यप्रतीची संपुर्ण संचिका मिळणेबाबत.

संदर्भ :- आपणांकडील दि. 20/03/2024 रोजीचा माहिति अधिकारातील अर्ज.

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये, आपण मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील टेंबा हॉस्पीटल चे नामकरण पंडित भिमसेन जोशी रुग्णालय, राष्ट्रपती अब्दुल कलाम नाट्यगृहाचे नामकरण लता मंगेशकर नाट्यगृह असे नामकरण करण्यात आलेल्या ठराव व या ठरावाच्या संपूर्ण संचिकेची मागणी केलेली आहे.

त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संदर्भित पत्रात नमुद ठरावाच्या संचिकेसंबंधीत माहिती हा विषय मिळकत विभागाशी निगडीत आहे. करिता या कार्यालयाकडील पत्र क्र. मनपा/सचिव/मा.अ./04/2024, दि. ०२/04/2024 अन्वये आपणांस उक्त माहिती परस्पर उपलब्ध करुन देणेकामी संदर्भित पत्राची छायांकित प्रत जनमाहिती अधिकारी, मिळकत विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचकडे वर्ग करण्यात आली आहे. तरी कृपया आपण सदर माहिती परस्पर घ्यावी. आपणांस मा. महासभा दि. 19/11/2008 ठराव क्र. 63, व मा. विशेष महासभा दि. 26/08/2022 ठराव क्र. 49 या ठरावाच्या सत्यप्रती आपणांस उपलब्ध करुन देत आहोत.

उक्त माहितीकरिता लागणारे शुल्क प्रति पान रुपये 2/- याप्रमाणे एकूण 4 पानांकरिता रुपये 8/- (अक्षरी रुपये आठ मात्र) महानगरपालिका फंडात भरणा करुन पावतीची छायांकित प्रत जमा करुन माहिती घेण्यात यावी.

कळावे.

(जयेश दामोदर पाटील)
सहा. जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

3/4/2024

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
सचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./ ०४/2024 दिनांक :- ०२/०४/2024

प्रति,
श्री. ओमप्रकाश पाल,
काशिमिरा, जनता नगर,
दत्त मंदिर रोड, हरीओम चाळ समोर,
सरोगी बिल्डींगच्या बाजूला,
पो. मिरा, ता.जि.ठाणे 401107.

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार 2005.
ठरावाच्या सत्यप्रतीची संपुर्ण संचिका मिळणेबाबत.

संदर्भ :- आपणांकडील दि. 20/03/2024 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये, आपण मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील टेंबा हॉस्पीटल चे नामकरण पंडित भिमसेन जोशी रुग्णालय, राष्ट्रपती अब्दुल कलाम नाट्यगृहाचे नामकरण लता मंगेशकर नाट्यगृह असे नामकरण करण्यात आलेल्या ठराव व या ठरावाच्या संपूर्ण संचिकेची मागणी केलेली आहे.

त्या अनुषंगाने आपणांस मा. महासभा दि. 19/11/2008 ठराव क्र. 63, व मा. विशेष महासभा दि. 26/08/2022 ठराव क्र. 49 या ठरावाच्या सत्यप्रती या पत्रासोबत जोडून देत आहोत.

उक्त माहितीकरिता लागणारे शुल्क प्रति पान रुपये 2/- याप्रमाणे एकूण 4 पानांकरिता रुपये 8/- (अक्षरी रुपये आठ मात्र) महानगरपालिका फंडात भरणा करुन पावतीची छायांकित प्रत जमा करुन माहिती घेण्यात यावी.

कळावे.

3/4/2024

(जयेश दामोदर पाटील)
सहा. जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०४/०९/२०१५

**प्रकरण क्र. ८५ :-** **सन्मा. सदस्य श्री. प्रशांत केळूसकर यांचा दिनांक ३१/०८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- माजी राष्ट्रपती "स्व. ए.पी.जे. अब्दुल कलाम नाट्यगृह" असे नामकरण करणेबाबत.**

**ठराव क्र.५९:-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ लगतच्या मौजे महाजनवाडी येथील सर्व्हे क्र. ९२ पै. (ठाकुर मॉलजवळ) या जागेमधील नागरी सुविधा क्षेत्राच्या भुखंडामध्ये महानगरपालिकेचा एकही रुपया खर्च न करता विकासकामार्फत अद्यावत व सुसज्ज असे तीन मजली नाट्यगृह विकसीत होणार असून दि. ३०/०८/२०१५ रोजी सदर नाट्यगृहाच्या जागेचे भुमीपुजन देखील झाले असून सदर नाट्यगृह आपल्या मिरा भाईंदर शहराचे आकर्षण ठरणार आहे. आपल्या भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी देशास दिलेल्या अमुल्य भेटीस्तव सदर नाट्यगृहात प्रथम दर्शनी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा पुतळा उभारुन सदर नाट्यगृहास "भारतरत्न स्व.ए.पी.जे. अब्दुल कलाम नाट्यगृह" असे नाव देण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत केळुसकर** **अनुमोदक :- श्री. रमेश जैन**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| २ | शरद केशव पाटील | २ | भावसार शिल्पा कमलेश | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | पाटील वंदना विकास | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | पाटील सुनिता कैलास | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | पुजारी कांचना शेखर | |
| ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | ८ | डिसा मर्लिन मर्विन | |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | वंदना रामदास चक्रे | |
| १० | जैन गिता भरत | १० | इनामदार जुबेर | निरंक |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | खण्डेलवाल सुरेश | |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | मोईर कमलेश यशवंत | |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | अशोक तिवारी | |
| १७ | सुजाता रविकांत शिंदे | १७ | निलम हरिश्चंद्र ढवण | |
| १८ | पाटील प्रेमनाथ गजानन | १८ | शुभांगी महिन कोटियन | |
| १९ | सिंग मदन उदितनारायण | १९ | जयमाला किशोर पाटील | |
| २० | कांगणे यशवंत ठकाजी | २० | परमार अनिता भरत | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २१ | अनिल बाबुराव भोसले | २१ | गावंड मंदाकिणी आत्माराम | |
| २२ | कासोदरीया अश्विन श्यामजी | २२ | संध्या प्रफुल्ल पाटील | |
| २३ | जैन दिनेश तेजराज | २३ | प्रविण मोरेश्वर पाटील | |
| २४ | जैन रमेश धरमचंद | २४ | ठाकुर अरविंद दत्ताराम | |
| २५ | डॉ. राजेंद्र जैन | २५ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | |
| २६ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| २७ | केळुसकर प्रशांत नारायण | | | |
| २८ | मुन्ना सिंग | | | |
| २९ | दिप्ती शेखर भट | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/११/२००८

मिरा - भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर (प)

**प्रकरण क्र. ७० :-** नामकरण प्रस्तावांना मान्यता देणे. (मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेली प्रकरणे.)

**ठराव क्र. ६३ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध रस्ते, चौक, इमारती व वास्तू यांचे खालीलप्रमाणे नामकरण करण्याबाबत प्रस्ताव व सुचना मा. महासभेपुढे आल्या आहेत.

| अ.क्र. | ठिकाण | प्रस्तावित नांव |
|---|---|---|
| १ | घोडबंदर रेतीबंदर ते एम. टी. डी. सी. कडे जाणारा रस्ता | नेहरू नगर पिरपेट्टे शॉ दर्गा मार्ग |
| २ | मिरारोड भागातील रस्ता (शांतीनगर) | श्री. जयगुरु जम्मेश्वर मार्ग |
| ३ | पेणकरपाडा सुकाळ तलाव | साईदत्त तलाव |
| ४ | श्री. महाराज अग्रसेन मार्गावरील चौक | स्वातंत्र्यसेनानी दामोदर भाई बंगेरा चौक |
| ५ | संगीता शॉपिंग सेंटर समोरील महाराणा प्रताप मार्गावरील चौक | न्यायाधिश के. सदानंद हेगडे चौक |
| ६ | साई कॉम्प्लेक्स, मिरारोड (पूर्व) रस्ता | पी. जी. व्होरा रोड |
| ७ | जनतानगर मुख्य रस्त्यावरील प्रवेशद्वार | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वार |
| ८ | जनतानगर साईकृपा कॉम्पलेक्स उदयान | सावित्रीबाई फुले उदयान |
| ९ | आरक्षण क्र. ९६ क्रिडांगण | शहिद भगतसिंग क्रिडांगण |
| १० | भाईंदर (पू) नवघर शाळा इमारत | स्वातंत्र्य सैनिक कै. रामचंद्र पांडूरंग पाटील इमारत |
| ११ | उत्तन नाका चौक | श्री. बाप्टीष्टा चौक |
| १२ | भाईंदर (पू) इंद्रलोक १८.०० मीटर रस्ता | संत शिरोमणी नामदेव महाराज मार्ग |
| १३ | राधास्वामी सत्संग मार्ग, जनाभाउु रकवी मार्ग मार्ग व सुभाषचंद्र बोस मैदान चौक | राज राजेश्वर भगवान परशुराम चौक |
| १४ | मुर्धा बाल उदयान | ज्ञान ज्योती सावित्रीबाई फुले |
| १५ | मुर्धा मनपा शाळा क्र. २२,२३ | साने गुरूजी भवन |
| १६ | भाईंदर (प) गांधीनगरकडे जाणारा चौक | मान्यवर काशिरामजी चौक |
| १७ | भाईंदर (प) डॉ. आंबेडकर भवन मधील वाचनालय | डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन वाचनालय |
| १८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन मधील अभ्यासिका | सर डॉ. विश्वेश्वरय्या अभ्यासिका |
| १९ | राई व्यायाम शाळा | छत्रपती शिवाजी महाराज व्यायामशाळा |
| २० | भाईंदर (प) सालासर प्लाझा (भट्ट सोसायटी) ते तपस्या बिल्डींग रस्ता | डॉ. दिगंबर केशव कुलकर्णी मार्ग |
| २१ | भाईंदर (प) भिमनाथ बिल्डींग (सुदामानगर पाण्याची टाकी) ते देवदर्शन बिल्डींग | सौ. मायरा मेंडोन्सा मार्ग |
| २२ | भाईंदर (प) बद्रीनाथ बिल्डींग ते बाबुलनाथ | फुटरमल पुखराज परमार मार्ग |
| २३ | मिरा एम.आय.डी.सी. ते रॉयल कॉलेज रस्ता | केशव हरि पदाजी भोईर मार्ग |
| २४ | मिरा हनुमान मंदिर रंगमंच | हनुमान मंदिर रंगमंच |
| २५ | एम.आय.डी.सी. जलकुंभ | स्वातंत्र्य सैनिक कै. मोतीराम कमळया जावर जलकुंभ |
| २६ | मिरागांव सातकरी तलाव | तुळशी तलाव |
| २७ | काशिगांव प्रवेशद्वार | स्व.सौ. रमाबाई भीमराव आंबेडकर प्रवेशद्वार |
| २८ | खारीगांव मनपा शाळा क्र. ६ मधील हॉल | श्री गांवदेवी हॉल |
| २९ | अमरप्रेम बिल्डींग पासून स्वामी नारायण बिल्डींग पर्यंत | कै. अनंत विठ्ठल पाटील (राजा) मार्ग |

| | | |
|---|---|---|
| ३० | हावलू निवास ते तुलसी निवास पर्यत | जानकाई मंदिर मार्ग |
| ३१ | गांवदेवी मंदिर मार्ग, नवघर स्मशान मार्ग, नवघर गावात जाणारा मार्ग, लोढा कॉम्पलेक्स मार्ग | छत्रपती शिवाजी महाराज चौक |
| ३२ | भाईंदर (प) व्यंकटेश्वर पार्क उदयान | श्री. पीरबाबा रामदेव उदयान |
| ३३ | नवघर चाळघर परिसर (साईचरण बंगला) ते नवघर उघाडी पर्यतचा रस्ता | श्री. चाळघर मार्ग |
| ३४ | मिरारोड निलम पार्क, नयानगर चौक | बज्मे रजा चौक |
| ३५ | मिरारोड वाचनालय | राष्ट्रपिता महात्मा गांधी वाचनालय |
| ३६ | मिरारोड हॉस्पीटल इमारत | स्व. इंदिरा गांधी रूग्णालय |
| ३७ | मिरारोड रक्तपेढी | भारतरत्न स्व. राजीव गांधी रक्तपेढी |
| ३८ | शांतीनगर सेक्टर ४ मैदान | पंडीत जवाहरलाल नेहरू क्रिडांगण |
| ३९ | मिरारोड अयप्पा मंदिर ते हॉस्टेल पर्यंत | बाप्पा सिताराम मार्ग |
| ४० | शांतीविहार इमारती बाजुचा रस्ता | अयप्पा मार्ग |
| ४१ | शांतीनगर पोलिस चौकी समोरील चौक | शामळजी अजमेरा चौक |
| ४२ | शांतीपार्क, सेंट झेविअर्स समोरील चौक | श्री. गोवर्धन चौक |
| ४३ | उड्डाणपूल चौक पासून दहीसरकडे जाणारा १८.०० मीटर रस्ता | श्री. आचार्य श्री. महाप्रज्ञ मार्ग |
| ४४ | भाईंदर (प) नियोजित हॉस्पीटल इमारत | भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी हॉस्पीटल |
| ४५ | मिरारोड पूनम नगर नर्सरी | राणी लक्ष्मीबाई नर्सरी |
| ४६ | मुर्धा स्मशानभूमी | मुक्तीधाम |
| ४७ | मुर्धा बाल दफनभूमी | अमरधाम |
| ४८ | भाईदर (प) स्व. तेरेसा जॉन मेन्डोसा चौक समोर भैरव सृष्टी व जानकी हेरीटेज इमारती मधून पुढे जाणारा रस्ता | हाजी गुलाब लाडजी शेख मार्ग |
| ४९ | भाईंदर (प) विनायक नगर समाजमंदिर | श्री. भालचंद्र साधुराम अग्रवाल भवन |
| ५० | शांतीनगर ए - ८ व ९ ते स्मशानरोड | वैकुंठधाम मार्ग |
| ५१ | शांतीनगर सेक्टर ४ व ५ मधील रस्ता ते सृष्टी सुर्या शॉपिंग सेंटर समोरील टॉवर रस्ता | लायन्स क्लब मिरारोड मार्ग |
| ५२ | सृष्टी सेक्टर - ३ समोरील चौक | नवयुवान चौक |
| ५३ | सृष्टी सुर्या शॉपिंग सेंटर समोरील चौक | सृष्टी चौक |
| ५४ | शांतीनगर से. ८ सी २० समोरील मैदान | गणेश मैदान |
| ५५ | शांतीनगर से. ८ सी ३९ समोरील उदयान | चाचा नेहरू बालोदयान |
| ५६ | शांतीनगर से. ८ सी समोरील उदयान | मदर टेरेसा नाना नानी पार्क |
| ५७ | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग ते विनय नगर पर्यतचा रस्ता | विनय नगर मार्ग |
| ५८ | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील संघवी नगर चौक | भगवान गौतम बौध्द चौक |
| ५९ | भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. २१७,२३६ समोरील चौक | सेव्हन स्केअर चौक |
| ६० | भाईंदर (प) शंभू सदन ते क्लींट टॉवर पर्यत रस्ता | जिनदत कुसल सुरीजी मार्ग |
| ६१ | नवघर गांव उदयान | स्वातंत्र्य सैनिक कै. शंकर विठ्ठल पाटील उदयान |
| ६२ | पेणकरपाडा सुकाळ तलाव मार्ग | श्री. दत्त मंदिर मार्ग |
| ६३ | पेणकरपाडा मनपा शाळा समोरील सभागृह | स्व.सौ. गुलाब रामजी घरत सभागृह |
| ६४ | भाईंदर (प) उपकर कार्यालय | डॉ.श्री. बळीराम हेडगेवार भवन |
| ६५ | नवघर तलाव येथून संत निरंकारी बाबा हरदेवसिंहजी महाराज संतसंघ भवन मार्ग | संत निरंकारी बाबा हरदेवसिंहजी मार्ग |
| ६६ | शांती पार्क सेंट जोसेफ शाळे समोरील उदयान | बालगोपाळ उदयान |
| ६७ | शांतीपार्क एचडीएफसी बँक ते आरएनए कोर्ट यार्ड, | साईबाबा मार्ग |

| | | |
|---|---|---|
| | सेक्टर ९,१० रस्ता | |
| ६८ | मिरारोड शितल नगर चौक | सेंट जोसेफ चौक |
| ६९ | मिरारोड बरखा हॉटेल ते सेंट थॉमर्स चर्च रस्ता | सेंट थॉमस मार्ग |
| ७० | मिरारोड सेंटर प्लाझा हॉटेल ते क्लब ९ पर्यत रस्ता | ब्रम्हकुमारी मार्ग |
| ७१ | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील शिवार गार्डन समोरील चौक | आचार्य श्री तुलसी चौक |
| ७२ | भाईंदर (प) सेस कार्यालयासमोरील चौक | आचार्य श्री. महाप्रज्ञ चौक |

149

यापूर्वी ज्या रस्त्यांची / उदयाने, चौक व इतर वास्तूची नामकरणे झाली आहेत अशी नामकरणे वगळून मा. सदस्यांनी सुचविलेल्या वरील नामकरण प्रस्तावांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची "ड" मधील प्रकरण अकरा (२) (१) (अ) अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. मिलन पाटील**

**दि. २०/११/२००९ रोजीच्या मा. महासभेत इतिवृत्तांत मंजूरी करिता ठेवले असता खालील प्रमाणे दुरुस्ती सुचविण्यात आली.**

१) मुळ ठरावामध्ये अ.क्र. ५९ चा उल्लेख नाही. कृपया ती नोंद वगळावी.

२) अ.क्र. ७२ वर महर्षी दधिच चौक अशी नोंद करावी.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष महासभा दि.२६/०८/२०२२

विषय :- नाट्यगृहाचे नामकरण बदली करणेबाबत..

ठराव क्र. ४९ :-

मिरा भाईंदर शहरातील महाजन वाडी गावठण येथे शहरातील नाट्य रसिक प्रेक्षक आणि कलाकार यांच्या सोयीकरीता ३०० आणि ९०० असे एकूण १२०० आसन क्षमता असणारे २ सुसज्ज नाट्यगृहाचे निर्माण पूर्ण झाले असुन सदर नाट्यगृहास "डॉ. ए.पी.जी. अब्दुल कलाम" यांचे नाव देण्यात आलेले होते.

परंतु मिरा भाईंदर शहरामध्ये प्रथमच निर्माण झालेल्या या सुसज्ज नाट्यगृहास एक विशेष बाब म्हणून **"भारतरत्न गानसम्राज्ञी स्व. लता मंगेशकर सभागृह"** असे नाव देण्यात यावे अशी मागणी शहरातील नाट्यरसिक, कलावंत आणि प्रेक्षक यांनी केली आहे. त्याअनुषंगाने सदर नाट्यगृहास **"भारतरत्न गानसम्राज्ञी स्व. लता मंगेशकर सभागृह"** असे नाव देण्यात यावे असे मी सभागृहातील उपस्थित सदस्यांना विनंती करीत आहे.

तद्वतच या नाट्यगृहाच्या उद्घाटना प्रसंगी महापालिकेतील सर्व सदस्यांची नावे असलेली पाटी नाट्यगृहाच्या दर्शनी भागामध्ये लावण्यात यावी. तसेच सदर नाट्यगृहामध्ये विकसीत केलेल्या छोट्या सभागृहाचे रक्कम रु.२५,०००/- आणि मोठ्या सभागृहाचे रक्कम रु.५०,०००/- इतके भाडे आकारून वापरण्यात आलेले लाईट युनिट प्रमाणे इलेक्ट्रीसिटी कंपनी आकारत असलेले दर संबंधीतांकडुन घेण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- (स्वाक्षरी) अनुमोदन :- (स्वाक्षरी)

ठराव बहुमताने / सर्वानुमते मंजुर

(स्वाक्षरी)
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

माहिती अधिकार अधिनियम 2005 अन्वये उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या कागदपत्रांची/अभिलेखाची सत्यप्रत

सह.जनमाहिती अधिकारी
सचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका